# राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे
## जुनी मध्यवर्ती इमारत, तळ मजला, पुणे-४११००१

**फोन नं.(०२०) २६०५०६४१** **ई-मेल आयडी :-** sceapune@gmail.com

जा.क्र.रासनिप्रा/विधि व न्याय/कक्ष-१४/अधिवक्ता तालिका /२०१८ /८९ दिनांक ०४ /०१/२०१८

प्रति,
मा. महासंचालक,
माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
महाराष्ट्र राज्य, हुतात्मा राजगुरु चौक,
मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.

विषय :- महाराष्ट्र राज्यातील मा.उच्च न्यायालय खंडपीठ नागपूर तसेच सहकार न्यायालये व सहकारी अपील न्यायालयापुढे प्राधिकरणातर्फे सहकारी संस्थांचे निवडणूक विषयक कामकाज करणा-या अधिका-यांची बाजू न्यायालयापुढे मांडणेसाठी प्रत्येकी एका वकीलास तालीकेवर घेणेबाबत जाहीर निवेदन शासकीय दराने प्रसिध्द करणेबाबत.

राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, पुणे यांना मा. उच्च न्यायालय खंडपीठ नागपूर तसेच महाराष्ट्र राज्यातील सहकार न्यायालये व सहकार अपिल न्यायालयातील निवडणूकां विषयक वादामध्ये प्राधिकरण व प्राधिकरणाधिकृत निवडणूक अधिकारी यांच्यातर्फे बाजू मांडण्यासाठी व प्रकरणे हाताळण्यासाठी मा. उच्च न्यायालय खंडपीठ नागपूर साठी १ अतिरीक्त अधिवक्ता व सहकार न्यायालये मुंबईसाठी ४ अधिवक्ते तसेच पुणे, सांगली साठी प्रत्येकी २ असे एकूण ४ व ठाणे, अलिबाग(रायगड), नाशिक, जळगाव, अहमदनगर, श्रीरामपूर, कोपरगाव, नांदेड, नागपूर, लातूर, अमरावती साठी प्रत्येकी १ त्याचप्रमाणे सहकार अपिलेट न्यायालय मुंबई, नागपूर व पुणे साठी प्रत्येकी १, प्राधिकरणाची बाजू मांडणेसाठी व प्रकरणे हाताळण्यासाठी पात्र व इच्छूक अधिवक्त्यांकडून प्राधिकरणाचे तालिकेवर नियुक्तीसाठी जाहीर निवेदनाव्दारे आवेदनपत्र मागविणेबाबतची जाहीरात औरंगाबाद, कोल्हापूर, सातारा, सोलापूर वगळून महाराष्ट्र राज्यातील संबंधित सर्व विभाग स्तरावर प्रादेशिक वृत्तपत्रामध्ये **दि.१६.०१.२०१८** रोजी फक्त एक वेळच्या मधल्या पान क्र. ३ व ४ मध्ये प्रसिध्द करावी.

उपरोक्त निवेदन कमीत कमी जागेत व शासकीय दराने प्रसिध्द करून देयके विहीत नमून्यात व आकारात प्राधिकृत पत्रासह उपलब्ध करून देण्यात यावी.

**मा.आयुक्त राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण यांचे आदेशाने**

०५/०१/१८

**(यशवंत गिरी)**
**सचिव**
**राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण,**
**महाराष्ट्र राज्य, पुणे**

**प्रत —**

१) मा.अपर मुख्य सचिव(सहकार), सहकार पणन व वस्त्रोद्योग विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई-३२
२) मा. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे
३) सर्व विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था
४) सर्व जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था

अ.क्र. ३ व ४ यांना सूचित करण्यात येते की, उपरोक्त जाहीर निवेदन त्यांनी मा. उच्च न्यायालय खंडपीठ नागपूर यांचे वकील संघाचे तसेच सहकार न्यायालयाचे व सहकार अपील न्यायालयाचे वकील संघाच्या सूचना फलकावर प्रसिध्द करावे.

५) लेखा शाखा

# राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे
# जुनी मध्यवर्ती इमारत, तळ मजला, पुणे-४११००१

फोन नं.(०२०) २६०५०६४१ ई-मेल आयडी :- sceapune@gmail.com

जा.क्र.रासनिप्रा/विधि व न्याय/कक्ष-१४/अधिवक्ता तालिका /२०१८ /Lel दिनांक : ०५/०१/२०१७

## -: जाहीर निवेदन :-

मा. उच्च न्यायालय खंडपीठ नागपूर, मा. सहकार न्यायालय व मा. सहकार अपिलेट न्यायालयातील सहकारी संस्थांच्या निवडणूकी विषयक वादांमध्ये प्राधिकरण व प्राधिकरणाधिकृत निवडणूक अधिकारी यांच्यातर्फे बाजू मांडणेसाठी व प्रकरणे हाताळण्यासाठी, मा. उच्च न्यायालय खंडपीठ नागपूर साठी १ अतिरीक्त अधिवक्ता व सहकार न्यायालये मुंबईसाठी ४ अधिवक्ता तसेच पुणे, सांगली, साठी प्रत्येकी २ असे एकूण ४ व ठाणे, अलिबाग(रायगड), नाशिक, जळगाव, अहमदनगर, श्रीरामपूर, कोपरगाव, नांदेड, नागपूर, लातूर, अमरावती साठी प्रत्येकी १ त्याचप्रमाणे सहकार अपिलेट न्यायालय मुंबई, नागपूर व पुणे साठी प्रत्येकी १ असे एकूण ३ अधिवक्ते बाजू मांडणेसाठी व प्रकरणे हाताळण्यासाठी, पात्र व इच्छूक अधिवक्त्यांकडून प्राधिकरणाच्या नामतालीकेवर (Empanelment) निवड करण्यासाठी, सचिव, राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे, जुनी मध्यवर्ती प्रशासकीय इमारत, पुणे-४०० ००१ यांचेकडून विहीत नमुन्यात आवेदन पत्र मागविण्यात येत आहेत.

जाहीरात, अर्जाचा नमुना, नेमणूकीसाठी पात्रता, अर्जासोबत सादर कराव्या लागणा-या स्वयं साक्षांकीत प्रमाणपत्राच्या छायांकित प्रती व कागदपत्रे. इत्यादीची माहिती सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे संकेतस्थळ https://sahakarayukta.maharashtra.gov.in वरून download करून मा. सचिव, राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे, जुनी मध्यवर्ती प्रशासकीय इमारत, पुणे-४०० ००१ यांचेकडे जाहीरात प्रसिध्द झालेपासून **<u>दि.१६/०२/२०१८</u>** पर्यंत सादर करावे. मुदतीनंतर प्राप्त झालेल्या आवेदन पत्राचा विचार केला जाणार नाही.

०५/०१/१८

सचिव
राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य, पुणे

ठिकाण – पुणे
दिनांक – ०५.०१.२०१८